— : मराठी अभ्यासक्रम :- 2020-2021.

कोअर कोर्स (सीसी - १८ - ३ क्रेडिट) सेमिस्टर - ३रे.

## मराठ्यांचा इतिहास - १६३० - १७०७

**युनिट - १.** स्त्रोत (साधने) आणि मराठा सत्तेचा उदय -(१०)

(अ) लिखीत साधने (वाङ्मयीन) मराठी आणि विदेशी अभिलेख साधने (पोर्तुगीज, इंग्लिश, फ्रेंच)

(ब) मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी

(क) शहाजी राजे, राजमाता जिजाबाई, छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रारंभिक जीवन.

**युनिट - २** स्वराज्याची स्थापना - राज्याभिषेक ते कर्नाटक मोहिम (१५)

(अ) आदिलशाही संबंध :- जावळी आणि अफझलखान - प्रकरण

(ब) मुघलांशी संबंध : शाहिस्तेखान स्वारी, सुरत लुट, जयसिंगची स्वारी, आग्रा भेट.

(क) राज्याभिषेक आणि कर्नाटक मोहिम.

**युनिट - ३.** छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन -(१०)

(अ) लष्करी प्रशासन

(ब) मुलकी (सिव्हील)

**युनिट - ४.** छत्रपती संभाजी महाराज आणि मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध. (१०)

(अ) छत्रपती संभाजी महाराज - मोघलांशी संबंध

(ब) छत्रपती राजाराम महाराज : महाराणी ताराबाई आणि मुघल

(क) संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि रामचंद्रपंत आमात्य

Scanned with CamScanner

15. जाने 2020

# युनिट - १ ले

(*) स्त्रोत (साधने) आणि मराठासत्तेचा उदय (*)

(अ) ~~लिखीत साधने (स्त्रोत) मराठी आणि विदेशी भाषेतील साधने~~

~~पार्श्वभूमी~~ :- इतिहास म्हणजे गतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना, घडमोडी व बदल या विषयी केलेले लिखाण होय. अर्थात काळाच्या पडद्याआड गेलेल्या मानवी जीवनातील घटनांचा व परिवर्तनाचा आलेख ऐतिहासिक लिखाणात आढळतो. अशा प्रकारचे लेखन करण्यासाठी संदर्भ साधनांची गरज असते. ही ऐतिहासिक साधने, कागदपत्रे, पुस्तके, मौखिक साधने अशा विविध रूपात उपलब्ध होतात. गतकाळातील घटना दृष्टीच्या आड गेलेल्या असतात. त्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता येत नाही. किंवा अनुभवता येत नाही. विविध लेखन साधनांचा आधार घेऊन त्याद्वारे लेखन करावे लागते. या विविध साधनाच्या उपयोग करून ~~[illegible]~~ संशोधकाला (इतिहासलेखकाला) गतकाळाची पुनर्निर्मिती करावी लागते. त्यामुळे ऐतिहासिक साधने हे इतिहास लेखकाच्या कच्चा मुसदा असतो.

त्यामुळेच प्रा. लँग्लोस व प्रा. सेनबॉस म्हणतात." NO DOCUMENTS NO HISTORY" (ना साधना ना इतिहास) थोडक्यात इतिहासाच्या अभ्यासासाठी साधने अतिशय महत्वाची असतात.

## (*) मराठ्यांच्या इतिहासाची साधने :- (आपल्याकडे)

इतिहास लेखन हा साहित्य प्रकार मराठेशाहीतही अस्तित्वात होता. मराठ्यांच्या इतिहासावर बखर रूपाने अनेक ग्रंथ मराठेशाहीत निर्माण झाले होते. तथापि इतिहासाकडे व ऐतिहासिक व्यक्तींकडे बघण्याची आमची दृष्टी शास्त्रीय नव्हती. आमच्या बखरकारांवर पुराणांची फार मोठी छाप पडलेली दिसते.

पुरावे गोळा करावेत, त्यांची छाननी करावी, त्यांचे मूल्यमापन करावे व त्यातून निष्कर्ष काढून इतिहास लिहावा. हा शास्त्रीय दृष्टिकोन बखरीत दिसत नाही.

मराठेशाहीचा शास्त्रीय दृष्टीने इतिहास लिहिला तो युरोपियनांनी. मराठेशाहीची अद्यापि अस्तही झालेली नव्हता. त्यावेळी इ.स. १८१० साली स्कॉट वेअरिंग या इंग्रज इतिहासकारने आपला मराठ्यांचा इतिहास प्रसिद्ध केला. त्यासाठी त्याने इंग्रज प्रवाशांचे वृत्तांत व आर ग्रंथ वापरले होते.

(PTO)

Scanned with CamScanner

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

पुढे मराठ्यांची सत्ता सन १८१० साली नष्ट झाली. साताऱ्याच्या गादीचे इंग्रजांनी पुनरुज्जीवन केले व साताऱ्यास ग्रँटडफ हा रेसिडेंट त्यांनी पाठवला. हा ग्रँटडफ मोठा चौकस, जिज्ञासू व इतिहासाचा अभ्यासक होता. ज्यांचे राज्य नष्ट करून आपण आकलन करून घेतले पाहिजे, असे त्यास वाटून त्याने मराठी कागदपत्रे जमविण्यास व त्यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्याच्या अविश्रांत परिश्रमातून व चिकाटीतून "मराठ्यांचा इतिहास" हा ग्रंथ तीन खंडात प्रकाशित झाला (स १८२६). मॉऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन सारख्या मुत्सद्द्याचे प्रोत्साहन मिळाल्यामुळे ग्रँटला महाराष्ट्रातील अनेक घराण्यातून महत्वाची कागदपत्रे सुलभपणे प्राप्त करता आली.

पुढे अनेक वर्षे ग्रँट डफचा इतिहास प्रमाण मानला जात होता. महाराष्ट्रीय समाजात अद्यापि जागृती न आल्याने त्यांना आपल्या इतिहासाचे महत्व कळत नव्हते. पण इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर इंग्रजी शिक्षित महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणांमध्ये (महाराष्ट्रीय मंडळीत) इतिहासबद्दलची आस्था जागृत होऊ लागली. युरोपियन इतिहासकारांनी आपल्या मराठ्यांच्या इतिहासात केलेल्या चुका त्यांच्या लक्षात येऊ लागल्या. या चुका युरोपियनांच्या एकदेशीय संस्कृतीच्या अज्ञानामुळे तर अनेकवेळा पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळे घडल्या होत्या. तेव्हा आपल्या पूर्वजांचा खरा इतिहास समाजापुढे ठेवला पाहिजे. ही जाणीव मराठी सुशिक्षित विचारवंतांत निर्माण झाली. अशा विचारवंतांत रावबहादूर नीळकंठ जनार्दन कीर्तने हे आद्य होत. त्यांनी सन १८६७ साली एक लेख लिहून ग्रँटडफच्या इतिहासातील चुका प्रथम दाखवून दिल्या. या लेखामुळे इतर अनेक विचारवंतांच्या नजरा मराठ्यांच्या इतिहासाकडे वळल्या. डफच्या चुका दुरुस्त करावयाच्या व स्वदेशाचा (मराठ्यांचा) खरा इतिहास लिहिण्यात मुख्य अडचण होती साधनांची. महाराष्ट्रात शेकडो ऐतिहासिक घराणी होती व त्यांच्याजवळ असणाऱ्या दफ्तरखान्यात लक्षावधी कागदपत्रे वाळवी लागून नष्ट होत होती.

ही कागदपत्रे शोधून त्यातील मराठ्यांच्या इतिहासाला उपयुक्त असणारी कागदपत्रे शोधून त्यातील मराठ्यांच्या इतिहासाला उपयुक्त असणारी कागदपत्रे छापण्याच्या कामात अनेकांनी प्रारंभ केला. त्यात जिनसीवाले, कीर्तने, चिपळूणकर, साने मोडक हे प्रमुख होत.

Scanned with CamScanner

परंतु कागदपत्रे शोधून ती संकलित करून ती आपल्या भाष्यासह प्रसिद्ध करण्याचे महान कार्य केले ते इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी. राजवाड्यांनी अनंत संकटे सोसून, प्रसंगी पायी प्रवास करून व डोईवर कागदपत्रांची ओझी वाहून, आपल्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या मालेचे २२ खंड प्रकाशित केले व हजारो कागदपत्रे प्रकाशात आणली. पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधक मंडळाची' स्थापना त्यांनी केली. (सन १९१०) तेव्हापासून हे मंडळ मराठ्यांच्या इतिहासाला उपयुक्त असणारी साधने सातत्याने प्रकाशित करत आहे.

इतिहासाचार्य राजवाड्यांशिवाय महाराष्ट्रात रावबहादूर द. ब. पारसनीस, रावबहादूर गणेश चिमणाजी वाड, पुरुषोत्तम विश्राम मावजी, वासुदेव शास्त्री खरे इत्यादी पंडितांनी मराठ्यांच्या इतिहासाची बहुमोल साधने स्वदेशप्रेमापोटी प्रसिद्ध केली. —

मराठ्यांच्या इतिहासाची साधने ही फक्त मराठीमध्येच नाहित. इंग्रजी, फ्रेंच, डच, पोर्तुगिज, फारसी, हिंदी, कानडी, संस्कृत अशा अनेक भाषांमध्ये आहेत.

येथे एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो असा की, शिवशाहीतील हजारो अस्सल कागदपत्रे काळाच्या ओघात नष्ट झालेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व्याप किती मोठा होता, तरीही त्यांची आजपर्यंत उपलब्ध असणारी पत्रे फार तर शे-दीडशेच्या घरात जातील. शिवाजी महाराजांनंतरच्या संभाजी, राजाराम व ताराबाई या राज्यकर्त्यांच्या बाबतीतही त्यांची कर्तबगारी समजून घेण्याच्या दृष्टीने हवी तेवढी साधने मिळत नाहित. याची दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रामध्ये २६-२७ वर्षे मोगलांशी जो संघर्ष झाला, त्या संघर्षात महाराष्ट्रातील प्रत्येक गाव कोणत्या ना कोणत्या तरी शत्रूच्या तडाख्यात सापडल्याशिवाय राहिले नव्हते. जाळपोळ व लुटालूट यांतून स्वतःचा जीव वाचविणे महत्त्वाचे असता अशावेळी कागदपत्रांचा कोण विचार करणार? तेव्हा शिवशाहीतील लक्षावधी कागदपत्रे अशा जाळपोळीत नष्ट झाली. सन १६८९ साली झुल्फिकारखानने रायगड घेतला, त्यावेळी त्याने रायगडावरील दफ्तरखाना जाळून टाकला.

दुसरे म्हणजे — शिवशाहीच्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या दुर्लक्षास खुद्द मराठा घराणी कारणीभूत आहेत. मराठ्यांनी इतिहास घडविला पण त्यांना इतिहासाचे महत्त्व कधीही वाटले नाही. पूर्वजांच्या पराक्रमाचा मराठ्यांनी अभिमान धरला, पण हे पराक्रम ज्यांच्या आधारे भावी पिढ्या खरे मानणार आहेत, त्या साधनांकडे दुर्लक्ष केले.

Scanned with CamScanner

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

परिणामी महाराष्ट्रातील अनेक घराण्यातील कागदपत्रे वाळवीचे भक्ष्य बनून नष्ट झाली. असेही शिवशाहीच्या साधनांचे शोकांतिका आहे की काही साधने आजपर्यंत उपलब्ध झालेली आहेत. त्यामुळे निर्माण होणारा शिवशाहीचा इतिहास तेजस्वी भासतो. जर सर्वच साधने जतन करून ठेवली असती, तर आमचा इतिहास आजच्या हून कितीतरी तेजस्वी व उज्ज्वल वाटला असता, यात शंका नाही.

सर्वसाधारण ज्यांच्या आधारे इतिहास लिहिला जातो, त्यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. आपण या उपघटकात मराठ्यांच्या इतिहासाची साधने अभ्यासणार आहोत. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे दोन प्रमुख प्रकार पाडता येतील - ① मराठी भाषेतील साधने व ② परकीय भाषेतील (परदेशीय) साधने —

मराठ्यांच्या इतिहासाची साधने

**मराठी भाषेतील साधने (शिवकालीन)**

1) मराठी कागदपत्रे
2) जेधे शकावली
3) आज्ञापत्र
4) बखरी → 1) सभासद बखर
2) चिटणीस बखर
3) ९१ कलमी बखर
4) चित्रगुप्ताची बखर
5) दळपतरायची बखर
6) शिवदिग्विजय बखर
7) मराठी साम्राज्याची छोटी बखर
8) चिटणीसकृत संभाजी महाराजांची बखर
9) व राजाराम महाराजांची बखर

**पेशवेकालीन साधने**

1) पेशवे दप्तर
2) राजवाडे संकलीत २२ खंड
3) पेशव्यांच्या रोजनिश्या
4) शाहूची रोजनिशी.

**परकीय भाषेतील (विदेशी) साधने**

1) पोर्तुगीज साधने
2) इंग्रजी साधने
3) फ्रेंच आणि डच साधने

परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत

1) जॉन फ्रायर
2) निकोलस मनुची
3) ॲबे कॅरे
4) विल्यम नॉरिस.

Scanned with CamScanner

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## (१) मराठी भाषेतील साधने :-

मराठी भाषांतील साधनांमध्ये मराठीकागदपत्रे, जेधेशकावली, आज्ञापत्र, बखरी. या बखरीमध्ये सभासदबखर, चिटणीस बखर, ९१कलमीबखर, चित्रगुप्ताचीबखर, दळपतरायची बखर, शिवदिग्विजय बखर, मराठी साम्राज्याची छोटीबखर, चिटणीसकृत संभाजी व राजाराम महाराजबखर, आणी पेशवेकालीन साधने मोडतात तर परकीय (विदेशी) भाषांतील साधनांमध्ये पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच व डच या भाषेतील साधने मोडतात. आपण प्रथम मराठी भाषेतील साधने पाहू —

**(अ) मराठी कागदपत्रे :-** मराठ्यांच्या इतिहासांसाठी जी साधने आहेत, त्यामध्ये पहिला दर्जा मराठी कागदपत्रांना दिला जातो. या कागदपत्रांत शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई या राज्यकर्त्यांची आज्ञापत्रे, दानपत्रे, इनामपत्रे, निवाडे इत्यादी कागदपत्रांचा समावेश होतो. तसेच ठाणेदारांनी, किल्लेदारांनी, सुभेदारांनी व प्रधानांनी लिहिलेल्या पत्रांचाही समावेश होतो. गोतसभा, देशकसभा, ब्रह्मसभा यांनी दिलेली निवाडपत्रेही त्यात मोडतात. वतनासंबंधी व इतर खटल्यासंबंधी लिहिल्या गेलेल्या पत्रांची संख्या बरीच मोठी आहे. ही कागदपत्रे प्रकाशात आणण्याचे प्रारंभीचे काम किनसीवाले, चिपळूणकर, कीर्तने, साने, मोडक इत्यादी महाराष्ट्रीय संशोधकांनी सुरू केले. त्यासाठी त्यांनी १८७८ साली 'काव्येतिहास संग्रह' नावाचे एक मासिक काढण्यास सुरुवात केली. पुढे १८९६ साली रा.ब. पारसनीस यांनी 'भारतवर्ष' मासिक काढून अनेक बखरी व कागदपत्रे त्यामध्ये प्रसिद्ध केली.

या सर्वांमध्ये इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांची कामगिरी अत्यंत मोलाची आहे. महाराष्ट्रातील शेकडो गावी पायपीट करून त्यांनी लाखो कागद जमविले आणी त्यातून निवडून हजारो कागद 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या मालेतून प्रसिद्ध केले. या ग्रंथमालेचे खंड प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी १९१० साली पुण्यास स्थापन झालेल्या भारत इतिहास संशोधक मंडळाने व धुळ्यातील 'राजवाडे संशोधक मंडळाने' आपल्या अनुक्रमे त्रैमासिक व संशोधक या मासिकातून हे कार्य चालू ठेवले.

कागदपत्रे प्रकाशात आणण्याचे सर्वात मोठे काम पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधक मंडळाने' केले आहे. आपल्या त्रैमासिकातून आजपर्यंत शेकडो कागदपत्रे व निबंध या संस्थेने प्रकाशित केले आहेत. आजपर्यंत या संस्थेने शिवचरित्र साहित्य या मालेत १३ खंडांच्यावर खंड प्रकाशित केले आहेत. याशिवाय तिने प्रकाशित केलेल्या शिवचरित्र प्रदीप या ग्रंथात अनेक शिवकालीन शकावल्या प्रसिद्ध झाल्या आहेत. सुप्रसिद्ध जेधे शकावली या ग्रंथात आहे. याशिवाय संस्थेने शिवशाहीतील कागदपत्रांचे एकत्रित असे 'शिवकालीन पत्रसारसंग्रह' या मालेचे ~~खंड~~ तीन खंड प्रसिद्ध केले आहेत.

Scanned with CamScanner

(२) जेधे शकावली :- शिवकालात काही प्रसिद्ध घराण्यात ऐतिहासिक घटना स्मरणाने लिहून ठेवण्याची पद्धत होती. त्यानुसार काही घराण्यांनी लिहून ठेवलेल्या नोंदी इतिहास संशोधकांना सापडल्या आहेत. अशा ऐतिहासिक नोंदी असणाऱ्या कागदास 'शकावली' असे म्हणतात. कारीचे जेधे-देशमुख यांच्या घराण्याच्या दप्तरात अशीच एक शकावली लोकमान्य टिळकांना मिळाली व ती त्यांनी 'शिवचरित्र प्रदीप' या संशोधक मंडळाने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात छापली.

कान्होजी नाईक-जेधे बाजी सर्जेराव या जेधे मंडळींनी शिवाजी महाराज, संभाजी महाराज इत्यादींची सेवा केली होती. अशा प्रकारे छत्रपती घराण्याशी निगडित असणाऱ्या घराण्यात ही शकावली त्या काळात लिहिली गेली. तिच्यातील नोंदी व तारखा अचूक आहेत. अशा प्रकारच्या आणखी १०-२० शकावल्या सापडल्या तर मराठ्यांच्या इतिहासात मोलाची भर पडली असती. ऐतिहासिक दृष्ट्या या शकावली-चे अपूर्व असे मोल आहे. ही शकावली शक १५४० पासूनच्या (इ.स.१६१८) नोंदी देते व ती शके १६१९ ला (इ.स.१६९७) संपते. शिवाजी महाराज, संभाजी-महाराज व राजाराम महाराज यांच्या चरित्रातील अनेक घटना कालक्रमाने तिच्यामध्ये दिलेल्या आहेत. मराठ्यांच्या बाजूने त्यांचा इतिहास समजून घेण्याचे हे उत्कृष्ट साधन आहे. ही शकावली आपणास प्रथम दर्जाची माहिती देते.

(३) आज्ञापत्र :- 'आज्ञापत्र' हा ग्रंथ शिवशाहीमधील प्रधान रामचंद्र पंडित अमात्य याने सन १७१५ च्या सुमारास लिहिला. शिवाजी महाराजांच्या तालमीत रामचंद्रपंत वाढल्यामुळे त्यांची राजनीती त्यास पूर्ण समजली होती. महाराजांची ही राजनीती त्यांच्या वारसांना मार्गदर्शक ठरावी, म्हणून रामचंद्रपंताने हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात एकूण ९ प्रकरणे आहेत. या प्रकरणांमध्ये राजा, त्याचे प्रधानमंडळ, व्यापार सावकार, वतने व वतनदार, वृत्ती, किल्ले, नौकरे, आरमार इत्यादी विषयांवर आपले विचार मांडले आहेत. हे विचार म्हणजे शिवाजी महाराजांची राजनीतीच आहे.

आज्ञापत्रात शिवकालीन राजनीतीचे उत्कृष्ट प्रतिबिंब दृष्टीस पडते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे प्रत्यक्ष शककर्त्या युगपुरुषाच्या राजकीय तत्त्वांचे आणि अनुभवांचे बोल या ग्रंथात प्रतिबिंबित झालेले आहेत."

Scanned with CamScanner

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

④ बखरी :- महत्त्वपूर्ण खबरी एकत्र करून मराठेशाहीत जो ग्रंथ पुढे आले ते म्हणजेच 'बखर' होय. बखरकारांनी तत्कालीन इतिहास शब्दबद्ध केला. अनेक प्रसंग रंगविताना बखरकारांनी अतिशयोक्ती केली असली तरी ऐतिहासिक सत्य आपणास नजरेआड करता येणार नाही. इतिहासाची शास्त्र मांडणी या काळात केली जात नव्हती. —

(१) छत्रपती श्री शिवाजी राजे यांची बखर (सभासद बखर) :—

शिवाजी महाराजांवरील ही सर्वात जुनी व शिवकालात लिहिली गेलेली बखर आहे. कृष्णाजी अनंत सभासद हा या बखरीचा कर्ता असून त्याने शिवाजी महाराजांचा पराक्रम स्वतः पाहिलेला व ऐकलेला आहे. राजाराम महाराजांच्या पदरी हा जिंजी येथे असताना त्यांच्या आज्ञेने आपण ही बखर लिहिली, असे तो प्रारंभीच सांगतो. ही बखर १६९७ च्या सुमारास जिंजीच्या किल्ल्यात लिहिली गेली. या बखरीत शिवाजी महाराजांचे प्रथमापासून मृत्यूपर्यंतचे सर्व पराक्रम वर्णिलेले आहेत.

मराठी इतिहासाच्या अभ्यासूंच्या दुर्दैवाने सभासदाने ही बखर फार संक्षिप्त अशी लिहिली आहे. तरीही महाराजांच्या काळातील ही बखर असल्याने तिला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या बखरीत महाराजांची राज्यकारभार व्यवस्था, लष्करव्यवस्था, प्रदेश, किल्ले, खजिना, सरदार इत्यादी अनेक बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

(२) श्री शिवछत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र (चिटणीसबखर)

मल्हार रामराव चिटणीस हा या बखरीचा कर्ता होय. तो शिवकालातील खंडो बल्लाळ यांच्या घराण्यातील (बाळाजी आवजींच्या) तो वंशज होय. सातारच्या छत्रपती शाहू महाराज यांच्या पदरी असलेल्या रामराव चिटणीस याने ही सात प्रकरणांची बखर सन १८११ मध्ये लिहिली. साताऱ्याच्या दप्तरखान्यातील कागदपत्रे, ऐकीव माहिती, परंपरेने चालत आलेल्या आख्यायिका यांच्या आधारावर मल्हार रामराव चिटणीस याने ही बखर सजवली आहे.

या बखरीवर भाष्य करताना इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, "वडिलार्जित कारकीर्द, दिनचर्या, शिवाजीने पाठविलेली व शिवाजीला आलेली अस्सल पत्रे व नकला यांचा उपयोग मल्हार रामरावाने केला होता. राजवाडे म्हणतात माझ्या मते हे चरित्र बरेच रोचक आहे अशी जरी या चरित्राची योजना आहे, तरी ग्रँट डफच्या ग्रंथात ही न सापडणाऱ्या अशा काही गोष्टी या चरित्रात सापडतात. मल्हार रामराव चिटणीसकृत चरित्राचा इतिहासकाराला बराच उपयोग होईल यात संशय नाही."

Scanned with CamScanner

(३) श्री शिवछत्रपती ९१ कलमी बखर :- ही बखर दत्ताजीत्र्यंबक वाकेनवीस यांनी लिहिली असून त्याचा लेखनकाल सन १६८० ते १७०७ या दरम्यान असावा. या बखरीत ९१ कलमे असून ती ९१ कलमी बखर या नावाने प्रसिद्ध आहे. मालोजी राजेभोसले यांच्यापासून शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास यात कथन केला आहे. मराठ्यांच्या इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून या बखरीला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते.

(४) चित्रगुप्ताची बखर :- ही बखर सभासद बखरीवर आधारित आहे. हिचा कर्ता रघुनाथ यादव चित्रगुप्त (चित्रे) हा असून बखरीच्या मजकुरात मधून मधून त्याने आपल्या कविता घुसडल्या आहेत. हा बखरकार ही बाळाजी आवजी चिटणीस यांच्याच घराण्यातील होता. या बखरीचे मूल्यमापन करताना इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, "रघुनाथ यादवाला परंपरेने ऐकलेली शिवाजी महाराजांची व त्यांच्या वेळच्या कर्त्या पुरुषांची माहिती सडकून होती. सभासद बखरीत ज्या पुरुषांची आडनावे दिली नाहीत. त्यांची आडनावे चित्रगुप्त लिहिण्याच्या ओघात सहजासहजी देऊन जातो. कधी कधी वर्णनात सभासद बखरीत जी नावे मुळीच नाहीत. ती ही नव्याने येतात. सारांश, रघुनाथ यादव हा माहितगार मनुष्य असल्यामुळे शिवाजीच्या इतिहास लिहिणाऱ्याला त्याचे मत वेळोवेळी घेणे जरूर पडेल." ही बखर सन १७६५च्या सुमारास लिहिली गेली असावी.

(५) दळपतरायाची बखर :- शिवाजी महाराजांच्या विरोधी पक्षात असणाऱ्या तत्कालीन मंडळींचे त्यांच्या कार्याविषयी काय मत होते, हे अजमाविण्यासाठी या बखरीचा उपयोग होतो. या बखरीतील तारखाही शिव चरित्र्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

(६) शिवदिग्विजय बखर :- ही बखर १८१८ साली लिहिली गेली आहे. हिचा कर्ता अज्ञात आहे. इतिहास-संशोधक नंदुरबारकर व दांडेकर यांनी तिचे संपादन केले व ती सन १८९५ साली प्रसिद्ध केली. शिवाजी महाराजांच्या चरित्रामधील अनेक घटना व ~~पराक्रम~~ पराक्रम यांचे वर्णन या बखरीत आहे. हे वर्णन करण्यासाठी आपण 'बारनिशी, दाखले, पत्रे व जुने ग्रंथ' यांचा आधार घेतल्याचे बखरकार नमूद करतो.

Scanned with CamScanner

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

(७) **मराठी साम्राज्याची छोटी बखर :-** या बखरीची रचना १७१५ साली झाली असावी. इतिहासकार बाळाजी जनार्दन मोडक यांनी ती 'काव्येतिहास-संग्रह' या मासिकात छापून काही स्थळ, काळ व व्यक्ती यांच्याबद्दल विपर्यास या बखरीत आहे. तरीही शिवचरित्रामधील काही नव्या बाबी या बखरीतून पुढे येतात. त्या दृष्टीने ही बखर महत्वाची वाटते.

(८) **चिटणीसकृत संभाजी महाराजांची बखर :-** मल्हार रामराव चिटणीस हा या बखरीचा कर्ता होय. संभाजी राजांचे चरित्र रेखाटण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. संभाजी महाराजांच्या जीवनातील अनेक विवादास्पद प्रसंग या चरित्रामधून डोकावतात.

(९) **राजाराम महाराजांची बखर :-** याही बखरीचा कर्ता मल्हार रामराव चिटणीस असून छत्रपती राजाराम महाराजांबद्दल सविस्तर माहिती या बखरीतून उपलब्ध होते. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा आढावा या बखरीमधून आपणास घेता येतो. संभाजी-राजाराम कालखंडातील अनेक घटना या बखरीमुळे आपणांस माहीत झाल्या आहेत.

वरील प्रमाणे शिवशाहीवर प्रकाश टाकणाऱ्या काही महत्वाच्या बखरी आहेत. या बखरीमध्ये अनेक दोष आहेत. बखरकारांनी ठिकाणे, काल, प्रसंग यांचे अनेक ठिकाणी अनेक घोटाळे केले आहेत. त्यामुळे सर जदुनाथ सरकारसारख्या इतिहासकाराने त्यांची इतिहास साधन म्हणून हेटाळणी केली आहे. तथापि बखरकारांना शास्त्रीय लेखन-पद्धतीव विचार पद्धती नव्हती. त्यांची शैली पौराणिक धाटणीची होती. पण त्यांचा प्रयत्न प्रामाणिक होता. या गोष्टी लक्षात घेतल्या तर बखरीतील उणिवा क्षम्य ठरतात. कृष्णाजी अनंत सभासद व मल्हार रामराव चिटणीस यासारख्या बखरकारांनी जुनी कागदपत्रे अभ्यासली होती. त्यांचा काही ठिकाणी त्यांना आधार घेतला होता. आता ती कागदपत्रे आपल्यास मिळत नाहीत तेव्हा त्यासाठी बखरींवरच विसंबून राहणे आवश्यक ठरते.

Scanned with CamScanner

दि: ६/७/२०२०

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## ② परकीय भाषेतील / विदेशी भाषेतील साधने :-

① पोर्तुगीज भाषेतील साधने :- पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने सन १४९८ साली समुद्रमार्गे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर कालिकत बंदरात पाऊल ठेवले आणि युरोपीयांचा भारताला समुद्र मार्गे झालेला पहिला परस्पर्श. आणि १५ व्या शतकापासून पोर्तुगीज हिंदुस्थानातील राजकारणात भाग घेऊ लागले. गोवा, साष्टी, बारदेश या भागात आपल्या राज्याची स्थापना करणारे पोर्तुगीज पहिले युरोपियन होत. मराठ्यांचे हे जवळचे शेजारी त्यामुळे त्यांच्या कागदपत्रात मराठ्यांच्या राजकारणाचे पडसाद उमटणे स्वाभाविक होते. हिंदुस्थानात (भारतात) गोवा व पोर्तुगाल मध्ये लिस्बन येथे असणाऱ्या दप्तरखान्यात मराठ्यांच्या इतिहासाशी संबंध असणारी हजारो कागदपत्रे आहेत.

पोर्तुगीज व्हाइसरायने आपल्या राजास लिहिलेली पत्रे, मराठी व मोगल सरदार यांना लिहिलेली पत्रे, आपल्या मंत्रिमंडळातील ठराव इत्यादींचा या साधनात समावेश होतो. या साधनांचा अभ्यास करून सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक डॉ. पांडुरंगराव पिसुर्लेकर यांनी पोर्तुगीज भाषेत मराठ्यांच्या इतिहासावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्याला पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेला पोर्तुगीज-मराठा संबंध हा ग्रंथ या संदर्भात महत्वाचा आहे. पिसुर्लेकर यांच्याप्रमाणेच श्री. ए. बी. द. ब्रागांस परेरा, अध्यक्ष पुराणवस्तु संशोधन विभाग, पोर्तुगीज सरकार, गोवा यांनी पोर्तुगीज कागदपत्रांचे अनेक खंड प्रकाशित केले आहेत, त्यांचा मराठी अनुवाद महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मराठ्यांच्या इतिहासाची-साधने : पोर्तुगीज-दप्तर या नावाने दोन खंडात प्रकाशित केला आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास यामुळे सखोलपणे होऊ शकतो.

② इंग्लिश साधने / इंग्रजी भाषेतील साधने :-

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता इत्यादी ठिकाणी अनेक वखारी (वसाहती) होत्या. प्रथम सुरत व नंतर मुंबई येथे इंग्रजांची प्रमुख वखार होती. या वखारी ज्या प्रांतात असत, त्या प्रांतातील राजकीय व व्यापारी घडामोडी, त्या आपल्या वखारीकडे कळवीत असत. व भारतामधील प्रमुख वखार भारतातील सर्व वृत्तांत इंग्लंडमधील आपल्या डायरेक्टरांना कळवीत असत. सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, व मद्रास या ठिकाणच्या वखारींच्या वृत्तांतांत-

Scanned with CamScanner

दि. ६/०१/२०२०

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

व त्यांच्या मंडळांच्या बैठकीच्या ठरावांत मराठ्यांच्या हालचाली, मोहिमा, राजकारण या विषयी अत्यंत मोलाची माहिती मिळते. हे इंग्रज व्यापारी स्वतः माहिती गोळा करत. तसेच हेरांच्याकडून बातम्या गोळा करत. त्यांच्या व्यापाराच्या संरक्षणा साठी हे करणे त्यांना आवश्यक होते. त्यांच्या या कागदपत्रांतून मराठ्यांच्या तारीखवार इतिहास लिहिण्यास मदत झाली आहे.

लंडन, कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादी ठिकाणी सरकारी दफ्तरखान्यांत कंपनीची लक्षावधी कागदपत्रे आहेत. मुंबई येथे सरकारी दफ्तरखान्यातही कागदपत्रे आपणास पाहावयास मिळतात. त्यापैकी सन १९३१ साली पुणे येथील शिवचरित्र कार्यालयाने शिवाजी महाराजांच्या संबंध असलेली इंग्रजी कागदपत्रे English Records on Shivaji या ग्रंथाच्या रूपाने एकत्रित छापली आहेत. ही कागदपत्रे स. १६५९ ते १६८२ या सालातील आहेत. शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना या ग्रंथाचा बहुमोल उपयोग होतो. त्याप्रमाणे मद्रास फॅक्टरी रेकॉर्डसचे अनेक खंड प्रसिद्ध झाले असून त्यांचा शिवशाहीतील मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचाली समजून घेण्यासाठी उपयोग होऊ शकतो. लंडनमधील "इंडिया ऑफिस" मधील शेकडो कागदपत्रांचे उतारे श्री वा. सी. बेंद्रे यांनी नकलून आणले आहेत.

फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी : कलकत्त्याचे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक व इतिहास लेखक डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी सन १९२७ साली फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी हा ग्रंथ संपादन करून मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनग्रंथात मोलाची भर टाकली आहे.

दि. ७/०१/२०२० (इ) फ्रेंच आणि अन्य साधने :

फ्रेंच साधने पॅरिस, लंडन इत्यादी ठिकाणच्या दफ्तरखान्यात आहेत. या दफ्तरखान्यात हिंदुस्थानातील फ्रेंच वखारवाल्यांनी मायदेशी लिहिलेली पत्रे, हिंदी राजांना व सेनानींना लिहिलेली पत्रे यांचा समावेश आहे. या सर्वांना मराठ्यांच्या शिवशाहीच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे साधन म्हणजे गव्हर्नर मार्टिन याने लिहिलेली रोजनिशी. या रोजनिशीचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी प्रसिद्ध केले आहे. मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचालीचा अभ्यास करण्यासाठी मार्टिनची ही रोजनिशी अत्यंत महत्त्वाची आहे. शिवाजी महाराजांची कर्नाटकाची स्वारी व राजाराम काळातील जिंजीचा वेढा यासंबंधी पहिल्या दर्जाची माहिती मार्टिन व इतर फ्रेंच अधिकारी आपल्या कागदपत्रांत देतात. "Relation between the French and the Marathas (1668-1815)" हा उत्कृष्ट ग्रंथ इतिहास संशोधक ~~डॉ. हातळकर~~ डॉ. हातळकर यांनी प्रकाशित व अप्रकाशित अशा फ्रेंच कागदपत्रांचा वापर

Scanned with CamScanner

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

करून तयार केला आहे. तो मराठा इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरतो.

इंग्लिश व पोर्तुगीज यांच्या तुलनेने डच्यांचा मराठ्यांशी तसा फार कमी संबंध आला, तरी हेग, बटाव्हिया, लंडन इत्यादी शहरी असलेल्या दफ्तरखान्यातील डच रेकॉर्डमध्ये मराठ्यांसंबंधी बरीच महत्त्वाची माहिती आढळते. या डच रेकॉर्डचा उपयोग डॉ. बाळकृष्ण यांनी आपल्या "Shivaji the Great" या ग्रंथाच्या ४ खंडात केलेला आहे.

डच्यांनी इ.स. १६०५ मध्ये मच्छलीपट्टण येथे वखार स्थापन केली त्यापाठोपाठ सुरत, वेंगुर्ला, कोरोमंडळ, मलबार इत्यादि ठिकाणी वखारी स्थापन केल्या होत्या. डच व पोर्तुगीज यांचे राजकीय वैर यामुळे डच ~~व पोर्तुगीज~~ हिंदी राज्यकर्त्यांशी पोर्तुगीजांविरूद्ध मदत करत असत. डच्यांचा सर्व पत्रव्यवहार ॲमस्टरडॅमला, वेस्ट इंडियन स्कॉलर्स हाऊस मध्ये संकलित केला आहे. शिवाजी महाराजांप्रमाणे छत्रपती संभाजीराजे डच्यांनी व्यापारी सवलती मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे तत्कालीन कागदपत्रांतून दिसून येते.

## (३) मराठेशाही कालखंडातील परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत :

(१) **जॉन फ्रायर** :- जॉन फ्रायर इ.स. १६७२-८१ या काळात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सर्जन म्हणून काम पाहत होता. त्याने रायगड, मुंबई, जुन्नर, कारवार, गोवा, कोंकण, वेंगुर्ला इत्यादि ठिकाणांना भेटी दिल्या. राज्याभिषेक प्रसंगी तो रायगडावर हजर होता. राज्याभिषेक प्रसंगाचा तो महत्वपूर्ण साक्षीदार होता. राज्याभिषेकाचे जॉन फ्रायरने केलेले चित्रण वास्तववादी आहे. सारांश, जॉन फ्रायरचे लिखाण मराठ्यांच्या इतिहासाचे महत्वाचे साधन ठरते.

(२) **निकोलस मनुची** :- निकोलस मनुची हा वयाच्या १४ व्या वर्षी हिंदुस्थानात आलेला इटालियन प्रवासी होय. इ.स. १६५६ मध्ये तो हिंदुस्थानात आला. तो परत मायदेशी गेलाच नाही. १७१७ मध्ये तो हिंदुस्थानात मृत्यू पावला. मनुची सर्व हिंदुस्थानभर फिरला. दाराशुको, औरंगजेब, शहाआलम, पोर्तुगिज, इंग्रज इत्यादींच्या पदरी त्याने नोकरी केली या काळात त्याने जे अनुभवले त्याचा वृत्तांत त्याने ~~स्टोरिया~~ 'Storio Do Mogor' (मोगलांचा इतिहास) या नावे प्रसिद्ध केला. त्याचे मराठी भाषांतर 'असे होते मोगल' या नावाने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केले आहे. हे भाषांतर.

Scanned with CamScanner

श्री. ना. स. पोवळ यांनी केले असून. मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात मनुचीचा ग्रंथ अनेक संदर्भ पुरवितो. छत्रपती शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई यांच्या संबंधीच्या अनेक हकीकती मनुचीने आपल्या ग्रंथात दिल्या आहेत.

(३) ॲबेकॅरे :- ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी होय. इ. स. १६६८ च्या सुमारास तो सुरत, गोवा, दमण, चौल, राजापूर इत्यादी ठिकाणी तो गेला होता. त्याने आपल्या प्रवासवर्णनात शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या विषयीच्या अनेक हकिकती नोंदविल्या आहेत.

(४) विलयम नॉरिस :- ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी मोगल बादशाहकडून व्यापारी सवलती मिळवत. मिळालेल्या सवलतींचे नूतनीकरण करण्याचे काम त्याने करावे लागे. असेल काम घेऊन विलयम नॉरिस इंग्लंडहून हिंदुस्थानात आला. तो सुरत येथे उतरून पुढे औरंगाबाद - शहागड - ब्रह्मपुरी - मिरज - करत-करत तो कोल्हापूरकडे आला. औरंगजेब बादशाह पन्हाळ्यास वेढा देऊन बसला होता. पन्हाळ्याजवळील छावणीत विलयम नॅरिसने मोगल - बादशहाची भेट घेतली.

मायदेशी गेल्यानंतर त्याने आपल्या प्रवासवृत्तांत लिहिला. यामध्ये बादशाहच्या छावण्या, त्यांची संरक्षण व्यवस्था, मोगल सरदारांमधील हेवेदावे, त्यांच्यातील वैर आणि मराठ्यांचा पराक्रम इत्यादींविषयी माहिती नमूद केली आहे. पन्हाळगडाच्या वेढ्याची विलयम नॉरिसने स्वतः पाहिलेली हकीकत अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

अशा प्रकारे शिवशाहीची, शिवकालोत्तर इतिहासाची अनेक साधने अनेक भाषांमधून अनेक संदर्भ ग्रंथांमधून विखुरली आहेत. शास्त्रशुद्ध इतिहास या काळात लिहिला जात नव्हता. तारीखवार इतिहास लिहावा, तो जतन करावा हे अपूर्व पराक्रम गाजवणाऱ्या मराठ्यांना जमले नाही. मराठ्यांचा सखोल इतिहास समजून घेण्यासाठी यामुळे परकीय लोकांच्या इतिहासावर त्यांच्या कागदपत्रांवर अवलंबून रहावे लागते.

महाराष्ट्रातील अनेक विद्वान इतिहासकारांनी, संशोधकांनी मराठ्यांच्या इतिहासाची हजारो कागदपत्रे प्रकाशात आणली. इतिहासाचार्य राजवाडे, पारसनीस, खरे, सरदेसाई, वेंद्रे, सेतुमाधवराव पगडी यांच्यापासून ते आजच्या तरुण इतिहास संशोधकांपर्यंत अनेकांनी मोठ्या कष्टाने मराठ्यांच्या इतिहास प्रकाशात आणला आहे. इतिहासाची स्वीन साधनसंपत्ती जशी वाढेल तसा सत्य व वास्तव्य इतिहास आपल्याने समोर येण्यास मदत होईल.

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## ४ (क) मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी :-

पार्श्वभूमी :- मराठ्यांचा इतिहास हे भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पर्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेला मराठ्यांचा इतिहास केवळ महाराष्ट्रालाच नव्हेतर संपूर्ण भारताला भुषणावह व गौरवास्पद आहे. मराठ्यांचा इतिहास हा भारताच्या इतिहासातील एक मोलाचा दगड आहे. हा टप्पा टाळून या देशाच्या इतिहासाला पूर्णत्व येणे शक्य नाही. महाराष्ट्रातील मराठी माणसाचे राजकीय स्वातंत्र्य चौदाव्या शतकात देवगिरीच्या पाडावा बरोबरच नष्ट झाले होते या मराठ्यांच्या राजकीय सामाजिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याला शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याने पुन्हा उर्जितावस्था प्राप्त करून दिली. हे शिवशाहीचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. मराठ्यांचा इतिहास खऱ्या अर्थाने जाणुन घ्यायचा असेल तर शिवपुर्वकालीन महाराष्ट्राला परिचय ~~करून~~ घेणे आवश्यक आहे. मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी :-

### ४ (१) भौगोलिक पार्श्वभूमी :-

भौगोलिक परिस्थितीचा इतिहासाच्या विविध पैलुवर परिणाम घडून येत असतो. भारताच्या भौगोलिक परिस्थितीचाही भारताच्या इतिहासावर परिणाम घडून आलेला आहे. महाराष्ट्रात मराठी सत्तेचा जो उदय घडून आला त्यासाठीही महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती अतिशय अनुकूल होती. महाराष्ट्राचा इतिहासही देशातील इतर प्रदेशापेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण असण्याचे कारण म्हणजे या प्रदेशाचा भूगोल. महाराष्ट्राचे एकुण क्षेत्रफळ ३०६,३४५ चौ. कि. मी. आहे. उत्तर दक्षिण व पुर्व-पश्चिम लांबी अनुक्रमे ७२० कि. मी. व ८०० किमी. आहे. उत्तरेला गुजरात व मध्यप्रदेश, पुर्वेला मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश, दक्षिणेला आंध्रप्रदेश व कर्नाटक ही राज्ये येतात. पश्चिमेला ५६० किमी. लांब सिमेवर अरबी समुद्र आहे. महाराष्ट्राचे भूरचनात्मक वैशिष्ट्ये म्हणजे पश्चिम भागात उत्तर-दक्षिण जाणारी सह्याद्री पर्वताची रांग, त्याची लांबी ६४० किमी असून सर्वसाधारण समुद्रसपाटीपासून ८०० ते १००० मीटर सह्याद्रीचा डोंगर. या भौगोलिक पार्श्वभूमीचा महाराष्ट्राच्या इतिहासावर परिणाम झाला आहे.

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## मराठे व मराठी भाषा :-

(२) महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ती

* या प्रदेशाला महाराष्ट्र हे नाव केव्हा मिळाले? एरणगाव या ठिकाणी सन ३६५ चा एक शिलालेख सापडला आहे. त्यात 'महाराष्ट्राला' स्पष्ट उल्लेख प्रथम आढळतो. अर्थात त्याच्यापूर्वीच 'महाराष्ट्र' हे नाव प्रचलित असणार, हे उघड आहे. इ.स. पूर्व पहिल्या शतकाच्या एका शिलालेखात महाराष्ट्राचा 'महरठ' असा उल्लेख आढळतो. या 'महरठा' चा पुढे 'महाराष्ट्र' झाला.

राजारामशास्त्री भागवत म्हणतात :- "आपल्या नियमावरून पाहता 'महाराष्ट्र' शब्दाचा 'महरठ' व 'सुराष्ट्र' शब्दाला 'सुराठ' असा अपभ्रंश व्हावा; पण शिलालेखात 'महरठ' व 'सुरठ' अशी शब्दांची रूपे आपण पहातो ही जर रूपे अस्सल खरी तर 'महरठ' उ 'महारथ' शब्दाचा व 'सुरठ' उ 'सुरथ' शब्दाचा अपभ्रंश असावा. 'महारथ' म्हणजे मोठा योद्धा' व 'सुरथ' म्हणजे चांगला योद्धा' 'महारथ' शब्दाचा पहिल्याने 'महरठ' व मरहट्ट असा अपभ्रंश होऊन कालांतराने या अपभ्रंशाचे पुनः 'महाराष्ट्र' असे संस्कृत रूपांतर आले.

मराठे लोक मूळचे कोण? याबद्दलही बरीच वेगवेगळे मत प्रतिपादन केली गेली आहेत. चि. वि. वैद्य यांच्यामते आर्यक्षत्रिय व नागवंशीय लोक यांच्या मिश्रणातून मराठे तयार झाले. डॉ. विल्सन यांनी मोल्सवर्थच्या शब्द-कोशाच्या प्रस्तावनेमध्ये महाराचे राष्ट्र ते महाराष्ट्र' अशी उपपत्ती दिली आहे. श्री. बा. जोशी यांचे मत असे आहे की, 'मर' (झाडी) आणि 'हट' (प्रदेश) या दोन कानडी शब्दांतून प्रथम 'मरहट्ट' व नंतर 'मराठा' असे शब्द तयार झाले आहेत. राजवाड्यांच्यामते 'रट्ट' नावाच्या महाराष्ट्रातील जमातीवरून 'मराठा' शब्द तयार झाला आहे. मराठे हे कोण याबद्दल बराच वाद असला तरी एक गोष्ट स्पष्ट आहे की, मराठे हे शुद्ध आर्यवंशीयही नाहीत, अथवा शुद्ध अनार्यवंशीयही नाहीत.

डोंगराळ प्रदेशांमुळे मराठ्यांची शरीरप्रकृती काटक व कष्टाळू आहे. शौर्य, धाडस, प्रामाणिकपणा, औदार्य ही त्यांची स्वभाव-वैशिष्ट्ये आहेत. ७० व्या शतकात भारतात आलेल्या युआन श्वांग या चिनी प्रवाशाने लिहून ठेवले आहे की, "मराठ्यांचे आचार-विचार साधे प्रामाणिक असतात. ते स्वाभिमानी व मितभाषी आहेत. जर त्यांना आपल्या शत्रूचा सूड घ्यायचा असेल तर ते त्याला अगोदर सावध राहण्याला इशारा पाठवितात आणि नंतर प्रत्येक जण शस्त्रसज्ज होऊन शत्रूवर हल्ला करतो. जेव्हा शत्रू पळ काढतो, तेव्हा ते पाठलाग करतात. तथापि, जेव्हा तो शरण येतो तेव्हा ते त्यास जीवदान देतात.

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

(३)

(*) **राजकीय पार्श्वभूमी** :- प्राचीन काळापासून यादवकाळापर्यंत महाराष्ट्रावर मौर्य, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य घराण्यांनी राज्य केले. यादवांनी चालुक्यांकडून महाराष्ट्राची सत्ता हस्तगत केली. इ.स ११८७ ते इ.स १२९४ अशी १०७ वर्षे यादवांनी राज्य केले. देवगिरी उर्फ दौलताबाद ही त्यांची राजधानी होती. या घराण्यात सिंघण, कृष्णदेव, महादेव व रामदेव हे पराक्रमी राजे होऊन गेले.

**खिलजी घराणे** याच काळात अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणाच्या रूपाने महाराष्ट्रात मुसलमानांनी दक्षिण भारतात प्रवेश केला. ५ फेब्रुवारी १२९५ रोजी अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर हल्ला करून रामदेवरायाचा दारुण पराभव केला. आणि महाराष्ट्रात इस्लामी सत्तेला प्रसार झाला. रामदेवानंतर त्याचा मुलगा शंकरदेवाच्या काळात अल्लाउद्दीनचा मुलगा मुबारकशहा याने इ.स १३१८ मध्ये देवगिरीवर हल्ला करून यादवांचे राज्य बुडविले आणि पुढे ३०० वर्षे महाराष्ट्र मुस्लिमांच्या अत्याचारी राजवटीखाली भरडून निघाला.

**विजयनगर साम्राज्य** :- इ.स १३३६ मध्ये हरिहर व बुक्कराय या दोन बंधुंनी तुंगभद्रे काठी विजयनगर येथे हिंदुसाम्राज्याची स्थापना केली ~~होती~~. हे साम्राज्य हिंदुधर्म, कला संस्कृतीचे माहेर घर म्हणून प्रसिद्ध झाले पण इ.स. १५६५ मध्ये आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही व बरीदशाही च्या संयुक्त फौजांनी विजयनगर साम्राज्यावर हल्ला करून ते नष्ट केले पण तरीही या साम्राज्याची वैभवशाली परंपरा मराठ्यांना प्रेरणा देत होती.

**बहामनी राज्य** :- इ.स १३४७ मध्ये गुलबर्गा येथे हसन गंगु बहामनीने बहामनी राज्य स्थापन केले. या राज्याने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. इ.स १४८५ मध्ये बहामनी सत्ता छिन्नविछिन्न होऊन तिचे पाच तुकडे झाले ते म्हणजे - वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही, व विजापूरची आदिलशाही यांचा महाराष्ट्राशी घनिष्ट संबंध आला.

शिवपूर्वकाळात या सर्व शाह्यांनी सुमारे पर सुलतानांनी सात तीन शतके महाराष्ट्रावर अनन्वित अत्याचार केले. याकाळात आदिलशाही व निजामशाही च्या दरबारात अनेक मराठे सरदार १६ व्या शतकात उदयास आले त्यांनी आदिलशाही व निजामशाहीत चाकरी करून स्वकर्तृत्वाने जहागिऱ्या व इनामे मिळाली आदिलशाहीच्या चाकरीत मोरे, निंबाळकर घाटगे, घोरपडे, भोसले, जाधव, माने, घोरपडे असे प्रमुख सरदार होते.

(*) होऊन गेलेल्या

तर अहमदनगरच्या निजामशाहीतही लष्करी व मुलकी चाकरीत मराठे असल्याने इतबारे काम करीत होते. त्यातीलच शिंदखेडचे जाधव आणि वेरूळचे भोसले या घराण्यातील हे पराक्रमी सरदार होते.

(४) **सामाजिक पार्श्वभूमी / सामाजिक परिस्थिती :-** १६ व्या-१७ व्या शतकातील समाज विविध जाती व पोटजातीत विभागला होता. त्यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच हा भेदभाव समाजात होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांची अवस्था बरी होती पण शूद्र व अतिशूद्रांना कुणीही वाली नसता. यवनी राजवटीत कर्तृत्वाला वाव न मिळाल्याने ब्राह्मणवृत्ती व क्षात्रवृत्ती लोप पावून समाज लाचार व गुलाम बनला होता.

इस्लामी राजवटीचा पहिला महत्त्वाचा परिणाम म्हणजे राजवंश बदलले. स्थानिक राजवंश नष्ट होऊन ज्यांचा धर्म, संस्कृती, भाषा, चालीरीतीशी जराही संबंध नाही अशा अपरिचित राजवंशीशी गाठ पडली. मुसलमानांच्या शासनातील महत्त्वाची पदे न मिळाल्याने स्थानिक क्षत्रियांना (मराठ्यांना) तलवार टाकून हाती नांगर धरावा लागला.

राज्यकर्ते बदलले तरी खेड्यातील ग्रामीण समाज जीवनावर त्याचा परिणाम होत नसे. कारण ग्रामीण ~~अर्थव्यवस्था~~ जीवन हे स्वयंपूर्ण होते. शेती हा मुख्य व्यवसाय असून बहुतेक सर्व गरजा खेड्यातच पूर्ण होत. पाटील, कुलकर्णी हे खेड्यातील प्रमुख अधिकारी असून ते सर्व शासकीय कामे करत.

या शिवाय कुलकर्णी, चौगुला, शेटे-महाजन, देशपांडे इ. वतनदार होते. गावच्या हिशोब ठेवण्याचे काम कुलकर्णी करी. एकंदरीत शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी महाराष्ट्रात सामाजिक परिस्थिती पारंपारिक व चैतन्यहीन अशाच स्वरूपाची होती.

(५) **धार्मिक पार्श्वभूमी / धार्मिक परिस्थिती :-** महाराष्ट्रातील लाचार आणि अस्मिता हरवून बसलेल्या लोकांत जागृती, स्वाभिमान व एकता निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य १३ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत ~~[illegible]~~ विविध स्तरातील साधुसंतांनी केले. एकटा विचारवंत कोणतीच क्रांती घडवून आणू शकत नाही. त्यासाठी विचारवंतांची अखंड मालिका निर्माण व्हावी लागते. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, सावतामाळी, गोरा कुंभार ही ती मालिका होय. या विचारवंतांनी समाजाला विचार दिला. या वैचारिक बैठकीतून

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA



छत्रपती शिवाजीला आचार करण्यास प्रवृत्त केले. महाराष्ट्रातील हे विचारवंत म्हणजेच संतमंडळी.

१३ व्या शतकाच्या अखेरीपासून सुरु आलेली मुस्लिमांची आक्रमणे. त्यानंतर काही काळ चाललेली दिल्लीच्या सुलतानांची सत्ता आणि नंतर स्थापन झालेली बहामनी सत्ता ही महाराष्ट्रावर आलेली सुलतानी संकटेची होती. अशात स्थितीत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतांचा या भूमित उदय आला नसता, तर महाराष्ट्राला सर्वनाश अटळ होता. १६ व्या व १७ व्या शतकात भक्ती आंदोलन अखंड चालु राहिले. १३ व्या शतकापासून संतांची एका मालिका निर्माण झाली आणि मध्ययुगीन कालखंडात भक्तिचळवळ निर्माण झाली ती प्रामुख्याने समाज सुधारणा करण्यासाठीच जेव्हा लक्षेने या संतांनी मराठी समाजाला एक विचार दिला आता गरज होती ती राजाची (नेतृत्वाची) त्यासाठी युगपुरुष जन्माला येणे आवश्यक होते. छत्रपती शिवाजीच्या रूपाने तो जन्माला आला.

## (६) आर्थिक परिस्थिती / आर्थिक पार्श्वभूमी :- तत्कालीन

आर्थिक परिस्थितीच्या महाराष्ट्राला भूगोलात जवळच्या सबब्य शेती डोंगराळ प्रदेशातील मराठी माणुस प्रामुख्याने शेतीवर अवलंबून होता शेतीही डोंगराळ व नापिक असल्यामुळे दारिद्र्यातच जीवन कंठीत होता. त्यातच सततच्या दुष्काळ, उद्योगधंदे शेतीला पुरक असल्यामुळे शेती बुडाली की, उद्योगधंदे ही बुडत, तरीही शासनाकडे शेतकऱ्यांची पिळवणूक करीत महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. पण मराठी माणसाचे आपल्या जमीनीवर अतिशय प्रेम, त्यात मिळेल त्यातूनच तो स्वतःच्या कुटुंबाची गुजराण करी. जमिनीविषयीच्या प्रेमातूनच तो स्वावलंबी बनला. आणि छत्रपती शिवाजीच्या स्वराज्य कार्यात सहभागी झाला. आपल्या शेतीला मुलुखगिरी हा जोडउद्योग बनवला.

Scanned with CamScanner

## ① मराठी सत्तेच्या उदयाची कारणे :–

मराठी सत्तेचा उदय ही ऐतिहासिक घटना महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे १८ व्या शतकात भारतातील एका प्रमुख राजकीय सत्तेत रूपांतर झाले. मराठ्यांचा इतिहास म्हणजे स्वदेशप्रेम, स्वधर्मप्रेम, राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया, स्वाभिमान, शौर्य, त्याग यांचे ज्वलंत उदाहरण होय. या सर्व गुणांचा आविष्कार मराठी सत्तेच्या उदयात पहावयास मिळतो. मराठा सत्तेच्या उदयाची कारणे पुढील प्रमाणे –

## ① महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती :–

भौगोलिक परिस्थितीचा राष्ट्राच्या इतिहासावर परिणाम घडून येत असतो. त्यास भौगोलिक घटक म्हणतात. मराठ्यांच्या उदयात महाराष्ट्राच्या भूगोलाचे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताच्या इतर भागापेक्षा महाराष्ट्राचा भूगोल वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्राची उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम लांबी अनुक्रमे ७२० आणि ८०० किलोमीटर आहे. पश्चिम भागात उत्तर-दक्षिण पसरलेली सह्याद्री पर्वताची रांग आहे. व त्याची समुद्रसपाटी पासून उंची ९०० ते १००० मीटर आहे. या किनारपट्टीमुळेच महाराष्ट्राचे तीन नैसर्गिक विभाग पडले आहेत – १) सह्याद्री व समुद्र या दरम्यानचा किनारपट्टीचा प्रदेश (कोकण).

२) सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी वेष्टीत प्रदेश (मावळ प्रदेश, घाटावर)

३) सह्याद्रीच्या पूर्वेकडील प्रदेश (देशावर)

सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी वेढलेल्या प्रदेशास दख्खनचे पठार म्हणतात. डोंगर, दऱ्याखोऱ्या, जंगले, नद्या ही या प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशातून तापी, भीमा, गोदावरी, मांजरा वगैरे नद्या वाहतात. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर किल्ले बांधून मराठ्यांनी त्याला आपली शक्तिस्थाने बनविले. या किल्ल्यांच्या आश्रयानेच आदिलशाही, मोगल बादशाहीशी लढा देऊ शकले. या प्रदेशाच्या भौगोलिक स्थानमुळेच गनिमी कावा हे युद्धतंत्र यशस्वी होऊ शकले.

## ② मराठ्यांचा स्वभाव :–

भूगोल व निसर्गाचा प्रभाव त्या त्या प्रदेशातील लोकांवर पडत असतो. डोंगराळ, खडकाळ प्रदेश, नापीक जमीन यामुळे या प्रदेशातील लोकांचे जीवन अतिशय कष्टमय होते. त्यामुळे काटकपणा, धाडस, चिवटपणा, संकटास धैर्याने तोंड देण्याची तयारी इ. गुण मराठ्यात निर्माण झाले आहेत. स्वावलंबन, आत्मनिर्भरता हा जीवनाचा स्थायीभाव बनला. एका दिवसात घोड्यावरून ५० ते ६० मैलाची रपेट करणे

किंवा १० ते १५ मैलाच्या पायी प्रवास करणे यातले त्यांना कष्ट वाटत नसे. प्रतिकूल निसर्गामुळे मराठ्यांच्या जीवन विषयक गरजाही कमी होत्या. स्वारीची भाकरी व मुठभर मिरच्या हे त्यांचे अन्न होते. पोटावर ही अत्यंत सुटसुटीत व जलद हालचाल करण्यास उपयुक्त होता. मांडचोळणा, खांद्यावर घोंगडी, पाठीवर ढाल, कमरेला तलवार आणि म्यानात भाला असा मराठा वीर त्वेषाने शत्रूवर तुटून पडत असे. मराठ्यांचा स्वभाव वाचन २

- सररिचर्ड टेंपल म्हणतो, मराठ्या जवळ विलक्षण स्वातंत्र्य प्रेम आहे ते दिसायला साधे आणि ठेंगू असले तरी त्यांच्यात उत्थान विलक्षण तेज आहे. काटकपणा, सहनशक्ती हे गुण वाखाणण्यासारखे आहेत."

एल्फिन्स्टन म्हणतो, 'मराठे सुंदर नसले तरी काटक आहेत ते उद्योगी, मेहनती, मजबूत बांध्याचे, व्यवहार कुशल आहेत. स्वतःच्या मान स्वार्थ व वतने यांचा त्याग करण्यास ते कधीच तयार होणार नाहीत. त्यांच्या ठिकाणी आळस नाही. ते चपळ, शौर्य, कष्टाळू, सतत उद्योगी आहेत. मराठ्यांच्या या अंगाच्या गुणांमुळे शिवाजी महाराज आदिलशाही विरुद्ध लढा देऊन स्वराज्यस्थापना करू शकले.

(3) मराठी भाषा व साहित्य — १२ व्या शतकापर्यंत बहुतेक साहित्य निर्मिती ही संस्कृत भाषेत होत असे. संस्कृत ही मुठभर लोकांची भाषा असल्याने हे साहित्य सामान्यांपर्यंत पोहचू शकत नसे. कारण सामान्यांची भाषा मराठी होती. १२ व्या शतकानंतर मराठी भाषेचा विकास होत गेला. विवेकसिंधु, लीळाचरित्र, नामदेव जनाबाई यांचे अभंग. ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा दासबोध ग्रंथ मराठीभाषेतून लिहिले. हे सर्व साहित्य घराघरामधून वाचले जाऊ लागले. समान भाषा व समान साहित्यामुळे मराठी समाज एकत्र येऊ लागला आम्ही सर्व एक आहोत ही एकीची भावना वाढीस लागली. ती ~~स्वराज्याचे~~ स्वराज्य निर्मितीस उपयुक्त ठरली.

Scanned with CamScanner

(४) संतांचे कार्य :- या काळात मराठी समाजात स्वधर्म संस्कृती याविषयी उदासिनता मरगळ आली होती. ही उदासिनता व मरगळ झटकून मराठी समाजात चैतन्य, एकजुट निर्माण करण्याचे महान कार्य संतांनी केले. या काळात महाराष्ट्रातील समाज हा अठरा पगड जातीचा होता. स्पृश्यास्पृश्य भावाच भावनेने तो पुर्ण पोखरला गेला होता. थोडक्यात या समाजाचा आत्मविश्वास गमावला होता. साधुसंतांनी मराठा समाजातील हा दोष हेरून काढून टाकण्याचा व एकसंघ मराठी समाज उभा रण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे हे साधुसंत विविध जातीचे होते. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम रामदास इ. संतांनी अत्यंत सोप्या भाषेत धर्माचे स्वरुप समजावून सांगितले. अस्मिता गमावलेली मने पेटून उठली ज्ञानबा तुकारामाच्या घोषातुन एक घोष साकार लागला तो घोष होता हर हर महादेवाचा छत्रपती शिवाजीला स्वराज्यानिर्मितीच्या कार्यात संतांची ही सामाजिक व धार्मिक चळवळ खुप उपयुक्त ठरली.

(५) मराठ्यांची तीर्थ क्षेत्र - पंढरपूर, देहु, आळंदी, पैठण, नाशिक, नेवासे ही मराठ्यांची तीर्थक्षेत्रे होती. अनेक साधुसंत पंढरपुरच्या विठ्ठलाचे भक्त होते. पंढरपुरच्या यात्रेच्या रुपाने महाराष्ट्रभर विखुरलेला समाज एकत्र येऊ लागला. उच्चनीचतेची भावना क्षीण होऊन सामाजिक समता व ऐक्य होण्यास मदत झाली. त्याचा फायदा स्वराज्य निर्मितीच्या कार्यास झाला.

(६) स्वतंत्र ग्राम संघटना :- मध्ययुगीन महाराष्ट्राच्या ग्रामिण भागात जी खेडी होती ती स्वतंत्र आणि स्वायत्त होती. या काळात राजकीय स्थित्यंतरे होत होती. पण ग्रामिण भागातील ग्राम संस्थांचे कार्य सतत चालत होते त्याच्यात कसलाही बदल होत नव्हता. पाटील व कुलकर्णी हे खेड्यातील कारभारी होते. खेडी स्वयंपूर्ण होती.

स्वतंत्र ग्रामसंस्थेमुळे प्रशासनाचा अनुभव मराठ्यांना मिळाला होता. स्वायत्त ग्रामसंस्थेमुळे खेड्यातील लोकांना स्वातंत्र्याचे बाळकडू बालपणापासूनच मिळे. त्यामुळे स्वातंत्र्य गमावण्याची त्यांची तयारी नसे या ग्राम संघटनेचे योगदान मराठा सत्तेच्या उदयाला अनुकुल ठरले.

(७) प्राचीन राजघराण्याचा वैभवशाली वारसा :- महाराष्ट्रात प्राचीन काळापासून अनेक राजकीय घराणी उदयास आली सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, कदंब, शिलाहरला पराक्रमी राजघराण्याचा वैभवशाली वारसा महाराष्ट्राला लाभला होता. पैठण, कल्याणी, बदामी, देवगिरी या प्राचीन राजघराण्यांच्या राजधान्यांनी देशाच्याच नव्हेतर जगाच्या राजकीय

नकाशात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले होते. देवगिरीचे राज्य घेण्याला लोभ खिलजींच्या सुलतानसही होता. मराठ्यांचे नाते या वैभवशाली व शक्तीशाली राजघराण्याशी होते. देवगिरीच्या यादवांनी अनेक वर्षे मुस्लिम सत्तांशी संघर्ष केला. त्याला स्फूर्तिदायी इतिहास शिवरायांच्या मनावर कोरला होता हे नष्ट झालेले वैभव पुन: प्राप्त करण्याची सुप्त महत्वाकांक्षा मराठ्यांच्या मनात होती ती स्वराज्य निर्मिती साठी स्फूर्तिदायी ठरली.

(5) विजयनगर साम्राज्य - स्वातंत्र्याची प्रेरणा :- इ स १३३६ मध्ये तुंगभद्रेच्या तीरी हरिहर व बुक्का या दोन बंधूनी विजयनगर साम्राज्याची स्थापना केली संपूर्ण भारत इस्लामी अत्याचाराखाली भरडला जात असताना दक्षिणेतील हे एकमेव हिंदूराज्य इस्लामी ~~अत्याचाराखाली~~ अत्याचाराला पायबंद घालण्याचे कार्य करीत होते. इ.स १५६५ मध्ये आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही बरीदशाहीच्या संयुक्त फौजांनी तालीकोटच्या लढाईत विजयनगर साम्राज्य नष्ट झाले. या पराभवाचे शल्य मराठ्यांच्या मनाला सतत बोचत होते. शिवाजी महाराजांच्या व मराठ्यांच्या मनात स्वराज्य निर्मितीची प्रेरणा निर्माण झाली त्यामागे या साम्राज्याचा पराभव हेही एक कारण ~~होते~~ होते.

(6) बहामनी राज्याचे विभाजन - इ.स १३४७ मध्ये हसन गंगु बहामनी याने बहामनी राज्य दक्षिणेत स्थापन केले होते १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात बहामनी राज्याचे पाच तुकडे पडले विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, अहमदनगरची निजामशाही, वऱ्हाडची इमादशाही आणि बीदरची बरीदशाही या शाह्या आपआपसात सतत लढत राहिल्या. या पाच शाह्यांनी संपूर्ण महाराष्ट्र आपल्या अत्याचारांनी भरडून काढला. या बहामनी शाहीतील अहमदनगरची निजामशाहीत उत्तर महाराष्ट्र तर विजापूरच्या आदिलशाहीत दक्षिण महाराष्ट्र विभागला होता. या इस्लामिक सत्तेचा अन्याय व अत्याचार सतत वाढत गेला. असतानाच येथील मराठ्यात एकत्याची भावना वाढत गेली. आणि त्यातूनच स्वराज्याच्या उदयास अनुकूल पार्श्वभूमी निर्माण झाली.

Scanned with CamScanner

दि. जून २०२०

(१०) <u>मराठ्यांना राजकारणातील अनुभव</u> :- दक्षिणेतील शाह्यांना एकमेकांशी सतत लढावे लागत होते. अहमदनगरची निजामशाही व विजापूरच्या आदिलशाहीत अनेक मराठा सरदार आपला पराक्रम गाजवित होते. १५ व्या शतकात महाराष्ट्रात घोरपडे, घाटगे, जाधव, जेधे, भोसले, माने निंबाळकर इत्यादी मराठा सरदारांनी स्वकर्तृत्वाने निजामशाहीत व आदिलशाहीत मोठमोठ्या ~~पदावर~~ पदे मानाची पदे मिळविली होती. या सरदारांना या शाह्यांमधून लष्करी व मुलकी प्रशासनाचा मोठा अनुभव मिळाला. मराठ्यांच्या पराक्रमावरच अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही टिकून होत्या. शहाजी व शिवाजीने स्वराज्य निर्मितीचा संकल्प सोडला त्याच्या या कार्यात मदत करण्यासाठी ही अनुभवी घराणी तयार होती.

(११) <u>आर्थिक विपन्नावस्था</u> :- महाराष्ट्रातील आर्थिक विपन्नावस्था ही ~~भौगो~~ भौगोलिक पार्श्वभूमी आणि सततचे सुलतानी आक्रमणे यामुळे आर्थिक दृष्ट्या येथील शेतकरी दुबळा होता. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या कार्यात मावळ शेतकऱ्यांनी महत्त्वाचे योगदान दिले होते. सहा महिने कोरडवाहू शेती करणे व दसऱ्या नंतर मुलुखगिरी करणे असा त्यांचा जीवनक्रम होता. सर्वसामान्य शेतकरी गरीब होता. त्यांना वारंवार दुष्काळ पडे. महाराष्ट्रातील ही आर्थिक ~~विपन्नावस्था~~ विपन्नावस्था ही शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मिती मागचे एक कारण होय.

(१२) <u>गनिमीकावा युद्धपद्धती</u> :- अहमदनगरच्या निजामशाहीचा वजीर मलिक अंबर या पद्धतीचा जनक मानला जातो. शहाजी राजांनी या पद्धतीचा अवलंब केला या पद्धतीचा शास्त्रशुद्ध अभ्यास करुन तिचा अनेक वेळा यशस्वी प्रयोग शिवाजी महाराजांनी केला. या पद्धतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे शत्रूचे सर्व अंदाज चुकवून त्यांच्यावर अचानक हल्ला करणे. शत्रू चाल करुन आल्यास माघार घेणे. डोंगरावर लपून छपून हल्ले करणे. शत्रूची रसद तोडणे. शत्रू विश्रांती घेत असेल किंवा थकला असेल तेव्हा हल्ला करणे. मराठ्यांना गनिमीकावा या नावाने ही युद्ध पद्धती ओळखली जाते स्वराज्याच्या निर्मितीत या गनिमीकावा पद्धतीचा फारच उपयोग झाला.

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

 दि ०८/०८/२०२०

(१३) महाराष्ट्रधर्म संकल्पना – इतिहासाचार्य राजवाडे यांच्यामते १७ व्या शतकातील विचारी पुरुषांची मने महाराष्ट्रधर्माच्या कल्पनेने भारून गेली होती. राजवाडे यांनी महाराष्ट्रधर्माची हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मण प्रतिपालन + स्वराज्य स्थापना + व्यक्तिकरण + धुरीकरण अशी उकल केली आहे. मराठा सत्तेच्या उदयाला व विस्ताराला ही कल्पना प्राणभूत ठरली असे राजवाडेंचे मत आहे.

(१४) शहाजीराजांना वारसा :- शहाजीराजांकडून शिवाजी महाराजांना कोणता वारसा मिळाला हा इतिहासकारामध्ये मोठा वादाचा विषय आहे. रियासतकार गो. स. सरदेसाई याचे मत "शिवाजीला जर राज्य-संस्थापक म्हणावयाचे तर शहाजीला 'राज्य संकल्पक' असे पद देण्यास हरकत नाही." असे आहे. तर प्रा. सदाशिव आठवले याचे मत – "स्वराज्याचा मामला हा सर्वस्वी शिवाजीचा आहे. शहाजीकडून मिळाला तो फक्त पुण्याचा जमीनजुमाला असे आहे. असे असले तरी शहाजी राजांकडून भोसले घराण्याची प्रतिष्ठा, जहागीर लष्करी सामर्थ्य, शौर्य व धाडस इत्यादींचा वारसा शिवाजी महाराजांकडे चालत आला होता. हे मान्य करावयास हरकत नसावी. आणि हा वारसा मराठा सत्तेच्या स्थापनेच्या कामी महाराजांना उपयुक्त ठरला याबद्दलही दुमत असण्याचे कारण नाही. कारण महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा प्रारंभ वाडवडिलांच्या जहागिरीतच झाला. ते ध्यानात ठेवले पाहिजे.

(१५) सर्वात प्रभावी कारण म्हणजे शिवाजीराजे होय. –

वर दिलेली सर्व कारणे ही मराठा सत्तेच्या उदयास पूरक ठरणारी कारणे आहेत. मराठा सत्तेच्या उदयाचे सर्वात प्रभावी कारण म्हणजे स्वतः शिवाजी महाराजच होत. शिवाजी महाराजांचा जन्म होण्यापूर्वीही सह्याद्री होता. कारक मावळे होते. सर्व काही होते. व या गोष्टी नंतरही होत्या व आहेत म्हणून काही महाराष्ट्रात शिवाजी पाठोपाठ शिवाजी निर्माण झाले नाहीत. या सर्व अनुकूल गोष्टींचा

Scanned with CamScanner

दिनांक ०८/०८/२०२०

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

राष्ट्राच्या उद्धारासाठी उपयोग करून घेणारा असामान्य नेता निर्माण व्हावा लागतो, तेव्हा अशी क्रांती होते.

Scanned with CamScanner